**महाराष्ट्र राज्य वीज नियामक आयोग ग्राहक तक्रार निवारण मंच व लोकपाल(ओम्बुडस्मन) विनिमय २००३ मधील ८(२) चे तरतुदीनुसार :**

सौ.सुप्रिया संजय सावंत, मु.पो.साडवली, देवरुख, ता.संगमेश्वर, जि.रत्नागिरी यांनी श्री.रामदास दत्तात्रय गुरव यांच्यावतीने तक्रार दाखल केली असून, ग्राहक क्र. २२३२३००१३०४६ असा आहे. वीज जोडणी प्राप्त झाल्यानंतर जी बिले देण्यात आली ती मिटर रिडिंग न घेता तसेच सरासरी पद्धतीची आल्याने तक्रारीस कारण उद्‌भवले असून ग्राहकाने अनुसुची 'अ' मध्ये आवश्यक त्या तपशिलासह दि.१०.१०.२०११ रोजी तक्रार दाखल केली आहे. तक्रार प्राप्त होताच मंचाकडील पत्र क्र.१०५४, दि.१२.१०.२०११ च्या पत्रानुसार कार्यकारी अभियंता, विभागीय कार्यालय रत्नागिरी यांच्याकडे स्पष्टीकरण मागितले असता सबंधित विभागाकडून पत्र क्र.६४९६, दि.११.११.२०११ नुसार आवश्यक त्या तपशिलासह स्पष्टीकरण दाखल झाले.

तक्रारदार ग्राहकाने तक्रारीसोबत वीज पुरवठा खंडीत करण्याविषयी आलेली नोटीस सादर केलेली असून वस्तुस्थिती पाहता थकीत बिलापोटी कोणत्याही परिस्थितीत वीजपुरवठा खंडीत होण्याची भिती असल्याने तात्पुरती स्थगिती आदेश मिळण्याची विनंती केली असल्याने, मंचाने तपशिलावरुन तात्पुरता स्थगिती आदेश दि.१०.१०.२०११ नुसार देण्यात आला.

ग्राहकाच्या तक्रारीचे स्वरुप असेकी, मौजे.साडवली, ता.संगमेश्वर येथिल सर्व्हे नं.९, हिस्सा नं.१० या मिळकती मध्ये 'हॉटेल लेझर पॉईंट' या नावाने हॉटेल व्यवसाय असून व्यवसायाची प्रस्तुत मिळकत खरेदी केल्यानंतर श्री.गुरव यांचे नावे असलेले कर्मशियल सिंगल फेज विद्युत मिटर क्र.९०१२५८२२६१ आणि ग्राहक क्र.२२३२३००१३०४६ असा असून पुरवठा हस्तांतरित करण्याविषयी वेळोवेळी पाठपुरावा करुनही आजतागायत नावातील बदल करण्यात आलेला नाही. सदरहू मिळकती बाबत दि.३०.०४.२०१० ते ३०.०४.२०१० या कालावधीचे रु.६२०/- आले असता आणि ते चुकीचे असल्याने व वीज वापर ३० युनिटचाच असल्याने सुधारीत बिल रु.३३०/- करुन देण्यात आले. त्यानंतर दि.२३.०४.२०११ पर्यंतची आलेली बिले नियमितपणे भरलेली आहेत. दि.२७.०७.२०११ चे बिल भरल्यानंतरही "अजून तुमच्याकडून रु.३६६५०/- ची थकबाकी आहे" आणि तपशिल विचारला असता हातानेच आकडेमोड करुन संबंधित कर्मचा-याने आपल्या मर्जीनुसार रक्कम रु.३६६५०/- चे बिल देऊन भरण्या विषयी दमदाटी करण्यात आली. सहाय्यक अभियंता व संबंधित कर्मचारी यांनी अपमानास्पद वागणूक देवून कनेक्शन कट करण्याविषयी ही वेळोवेळी दमदाटी केली. सदरहू रक्कम रु.३४८२०/- मी देय लागत नाही आणि मुळातच बिल चुकीचे असल्याने विद्युत कायद्याखाली विद्युत पुरवठा खंडीत होण्याविषयी काढलेली नोटीसही बेकायदेशीर आहे. अधिका-यांची मनमानी आणि वेळोवेळी होणा-या मनस्तापाचा व्यवसायावरही परिणाम झालेला आहे. तक्रार प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता दि.२७.०७.२०११ रोजीचे बिल पुर्णपणे चुकीचे असून दि.२९.०९.२०११ रोजी केलेली कार्यवाही सुद्धा बेकायदेशीर आणि नैसर्गिक न्यायतत्वाच्या विरुद्ध आहे. मंचाकडून योग्य न्याय मिळावा.

आयोगाच्या नियमावलीनुसार सदरहू तक्रार प्रकरणाची सुनावणी दि.२३.११.२०११ रोजी घेण्यात आली असता उभय बाजुंनी उपस्थित राहून युक्तीवाद करण्यात आला. स्वत: ग्राहक आणि त्यांचे प्रतिनिधी यांनी आपल्या युक्तीवादात स्पष्ट केले की, वीजेचा वापर सावंत यांच्याकडून होत असूनही बिले मात्र रामदास दत्तात्रय गुरव याच नावाने देण्यात आलेली आहेत. पुरवठा खंडीत करण्याविषयी काढलेली नोटीस सुद्धा

